# यावल महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी

यावल प्रतिनिधी- येथील ज.जि.म.वि.प्र.सह समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यात पंडित नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य अर्जुन पाटील यांनी भूषविले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा गणेश जाधव यांनी करून दिला. प्रमुख पाहुणे प्रा अर्जुन पाटील यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या कार्य ऊतांत सांगून उदयोन्मुख भारत देशाला विकसनशील देशाकडून विकसित देश करण्यात त्यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले यावेळी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले यावेळी वैष्णवी माळी आणि ललिता पाटील या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले उपप्राचार्य प्रा एम डी खैरनार,प्रा डॉ एस पी कापडे प्रा डॉ अनिल पाटील ,प्रा गणेश जाधव, प्रा संतोष जाधव,प्रा विनोद अहिरे, प्रा नरेंद्र पाटील, प्रा भारती सोनवणे, प्रा वैशाली कोष्टी प्रा सी टी वसावे प्रा सुभाष कामडी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा महाजन हिने केले तर आभार वैष्णवी माळी हिने मांनले यावेळी इतिहास विभाग मंडळ यांनी सहकार्य केले


कला, वाणिज्य व विज्ञान
पंडित जवाहरलाल नेहरू जयंती
'बालदिन'


कला, वाणिज्य व विज्ञान
पंडित जवाहरलाल नेहरू जयंती
'बालदिन'